

## आदिक प्रकरणाने महाराष्ट्राची नाचक्की
## पक्षातूनही हाकलण्याच्या मागणीस जोर

*१६ सप्टेंबर १९८४*

एककाळी वैभवसंपन्न व राजकीय प्रतिष्ठेचा, स्थैर्याचा मेरुमणी असलेल्या महाराष्ट्राची इंदिरा काँग्रेस नेत्यांपायी पार नाचक्की झाली आहे. गेल्या चार वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकीय नैतिकतेचे झपाट्याने अध:पतन सुरू झाले. अंतुले यांनी त्याचा पाया रचला व आता आदिक यांनी त्यावर कळस चढविला आहे. अंतुले यांच्या भ्रष्टाचारी कारभारामुळे महाराष्ट्र कलंकित झाला, बाबासाहेब भोसले यांच्या गलथान कारभारामुळे त्याचा फजितवाडा झाला नि उपमुख्यमंत्री रामराव आदिक यांच्या गैरवर्तनामुळे राज्याची उरलीसुरली शानही धुळीला मिळाली.

आदिक यांनी प. जर्मनीला जाताना विमानात व नंतर हॅनोवर येथे महिलांशी अशिष्ट वर्तन केले, हे वृत्त प्रसिद्ध होताच इंदिरा काँग्रेस वर्तुळात, संसदेच्या परिसरात, सेन्ट्रल हॉलमध्ये एकच खळबळ उडाली. पहिल्या बातमीत आदिक यांचे नाव नव्हते. पण ही बडी व्यक्ती म्हणजे आदिकच याबाबत सर्वांची खात्री होती. जो तो महाराष्ट्रातील खासदार, पत्रकार यांना 'काय चालवले आहे तुमच्या महाराष्ट्राने?' अशी खोचक विचारणा करू लागला. महाराष्ट्राची एवढी छीथू पूर्वी कधीही झाली नव्हती. केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर सबंध देशाच्या इभ्रतीला आदिक यांनी काळोखी फासली, असे प्रत्येक जण म्हणू लागला. त्यांच्या संबंधीचे प्रसिद्ध झालेले वृत्त सत्य आहे, अशी ग्वाही ट्रेड फेअर ऑथॉरिटीच्या (यांनी हॅनोवर प्रदर्शनात भाग घेतलेला आहे) एका वरिष्ठ अधिकाऱ्याने माझ्याशी बोलताना दिली.

### त्या दोन महिला

खरे पाहिले तर आदिक यांच्या धुन्द गुणांची, त्यांच्या छंदांची कल्पना पक्षश्रेष्ठींना पूर्वीपासून आहे. बाबासाहेब भोसले यांना मुख्यमंत्रीपदावरून दूर करताना नव्या मुख्यमंत्र्याचा जेव्हा शोध चालू होता, तेव्हा पक्षश्रेष्ठींच्या बैठकीत कोणीतरी आदिकांचे नाव सुचवले. त्यावेळी एक ज्येष्ठ नेते ताडकन म्हणाले, 'तुम्हाला त्यांचे चारित्र्य माहीत नाही वाटते?' आदिक नेहमी दोघा महिलांची नावे सतत पुढे करत असतात. त्यांपैकी एका महिलेला एका बड्या महामंडळाचे अध्यक्ष करावे, अशी शिफारसही त्यांनी बाबासाहेब

भोसले यांच्याकडे केली होती. अलीकडेच राज्यसभा पोटनिवडणुकीच्या वेळीही या महिलांची नावे त्यांनी सुचवली होती, असे म्हणतात. दिल्लीतील राज्य सरकारच्या महाराष्ट्र सदन या अतिथिगृहातील आदिक यांचे वर्तन हे वादविषय ठरलेले आहे. एकदा या अतिथिगृहात गर्दी झाल्याने आदिकांना हवी ती खोली मिळाली नव्हती, तेव्हा स्वागत-कक्षातील टेलिफोन त्यांनी भिरकावून देऊन अद्वातद्वा बडबड केली होती. याच महाराष्ट्र सदनात ते धुंद अवस्थेत वावरताना दिसले होते, असा किस्सा अजूनही मंडळी सांगतात. दिल्लीतील एक नेहमी सुगंधात न्हाऊन निघालेली रंगेल महिला आदिकांच्या पत्रकार परिषदेला एकदा हजर होती. त्या वेळी पत्रकार बुचकळ्यात पडले होते. अमरावतीच्या रेल्वे प्रवासातील आदिकांचे रंजक किस्सेही काही जण सांगत असतात. त्यात थोडी फार अतिशयोक्ती असेलही, पण त्यात तथ्य निश्चितच आहे.

याबाबत पक्षश्रेष्ठींनी आदिकांना सबुरीचा सल्लाही दिला होता. मध्यंतरी खाजगी गप्पा मारताना 'मी आता मद्य पिणे बंद करणार,' असे आदिक म्हणालेही होते. पण त्यांचा हा मनसुबा अल्पजीवीच ठरला. आदिकांनी त्या वेळीच लगाम घातला असता, तर गोष्टी या थराला येऊन ठेपल्या नसत्या.

## दादांवर अंकुश

आदिक हे हुशार असले; तरी त्यांची ही 'कीर्ती' पक्षश्रेष्ठींना ठाऊक होती आणि तरीही त्यांना उपमुख्यमंत्री केले गेले, कारण मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी पक्षाला ती राजकीय गरज वाटली होती. तेव्हा आपल्या राजकीय डावपेचांच्या सोयीसाठी आदिक यांना उपमुख्यमंत्रीपद दिले गेले होते. आता ही चूक पक्षाने सुधारावी, अशी मागणी जोर धरते आहे. इंदिरा काँग्रेसमधील एकही खासदार आदिकांची बाजू घेऊन बोलणारा दिसला नाही. त्यांना उपमुख्यमंत्रीपदावरूनच नव्हे तर पक्षातूनही काढून टाकावे, असे मत आहे. याबाबतीत विलंब करू नये, नाहीतर महाराष्ट्रात पक्षाची फार हानी होईल, असेही या मंडळींना वाटते. परंतु पक्षश्रेष्ठी असा निर्णय घेतीलच, अशी खात्री त्यांना वाटत नाही. कदाचित साराच मामला दडपून टाकला जाईल, अशी शंकाही त्यांना वाटते. तसे घडले तर या पक्षाला नैतिक मूल्यांची किती चाड आहे हेच दिसून येईल. काहीही असो, या साऱ्या प्रकाराने महाराष्ट्राच्या प्रतिमेची लक्तरे राजधानीच्या राजकीय वेशीवर टांगली गेली आहेत, राज्याची अस्मिता ढळली आहे हे नि:संशय.

## अपूर्व सायंकाळ

दिल्लीत राजकीय पक्षांच्या बैठका, परिषदा, संमेलने सतत होत असतात. त्यामानाने सांस्कृतिक समारंभ फारसे होत नाहीत. त्यातून जे सरकारी समारंभ असतात; त्यांत तर नियोजनाचा अभाव व रुक्षपणा असतो. साहित्य अकादमी, संगीत नाटक अकादमी यांचे समारंभही कसेबसे उरकून टाकण्याचे विधी वाटतात. या पार्श्वभूमीवर येथील

गांधर्व महाविद्यालयाने अलीकडेच आयोजिलेला कुमार गंधर्वांच्या सन्मानाचा सोहळा अद्वितीय होता. सुमारे पावणेचार तास चैतन्यात न्हाऊन निघालेली ती एक अपूर्व सायंकाळ होती. पन्नास वर्षे सुरांच्या प्रतिभा विलासाने लक्षावधी श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या कुमार गंधर्वांना रसिकांनी जणू हा मानाचा मुजराच केला.

एशियाड क्रीडानगरीतील देखण्या आलिशान सभागृहात कुमार गंधर्व यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीचा हा सोहळा आयोजिलेला होता. काही दिवसांपूर्वी याच सभागृहात इंदिरा काँग्रेस खासदार-आमदारांची बैठक भरली होती. पक्षात राजकीय बेसूर किती आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न तेव्हा झाला होता. त्याच सभागृहात त्या दिवशी मात्र सुरांची टवटवीत मैफीलच भरली. व्यासपीठावरील बारा ताम्रकलशांत मांडलेल्या निशिगंधांच्या सुवासाने वातावरण आधीच सुगंधमय झाले होते. ते क्षणार्धात संगीतमय होऊन गेले. दोहोंचाही दरवळ वातावरणात नि रसिकांच्या मनात रुणझुणत राहिला. कुमार गंधर्वांचे गाणे तर रंगलेच; पण त्यांच्या गौरवाची मोजकीच व आटोपशीर झालेली भाषणेही त्या मैफिलीतले लावण्य खुलविणारीच होती.

एकेकाळी स्वत: गाणे शिकण्याचा प्रयत्न केलेले सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश श्री. यशवंत चंद्रचूड हे अध्यक्षस्थानी होते. राजकारणात असूनही रसिकता अक्षय टिकवून ठेवलेले अटलबिहारी वाजपेयी यांनी मुद्दाम फोन करून आमंत्रण मागवून ते या सोनेरी संगीत सोहळ्याला हजर राहिले. केंद्रीय मंत्री वसंत साठे व मधू लिमये हे वेगवेगळ्या विचारांचे, वेगवेगळ्या पक्षांचे; पण दिल्लीतील अनेक संगीत व नृत्य कार्यक्रमांना मात्र ते आवर्जून हजर असतात. तेही यावेळी उपस्थित होते.

## उत्स्फूर्त सहकार्य

कुमार गंधर्वांना यावेळी १ लाख ५१ हजार एक रुपयांची थैली देण्यात आली. सरकार वा कोणत्याही मंत्र्याच्या दबावाखाली यासाठी देणग्या गोळा करण्यात आल्या नाहीत. लोकांनी उत्स्फूर्त सहकार्य दिले, असे मौद्‌गल्य यांनी सांगितले. मुळात लाख रुपये जमवायचे उद्दिष्ट होते; पण रसिकांच्या प्रेमाने हे उद्दिष्ट ओलांडले. कुमार गंधर्वांच्या भारतातील काना-कोपऱ्यांतील चाहत्यांना मौद्‌गल्य यांनी नुसते आवाहन करणारे पत्र पाठवले व देणग्यांचा ओघच सुरू झाला. विशेष म्हणजे या देणग्यांत मोठा वाटा उचलला आहे तो सर्वोच्च न्यायालयाच्या वकिलांनी. त्यांनी सुमारे चाळीस हजार रुपये दिले. न्या. चंद्रचूड या संदर्भात मिस्किलपणे म्हणाले, ''वकिलांना नुसते बोलायला आवडते असे नसून त्यांना ऐकायलाही आवडते. ते नुसते पैसे घेत नाहीत, तर पैसे देतातही!'' त्यांच्या या उद्‌गाराला अर्थातच टाळ्यांची दाद मिळाली. कुमार गंधर्वांनी विचार व हेतुपूर्वक केलेल्या नवनवीन प्रयोगांचा श्री. चंद्रचूड यांनी भाषणात उल्लेख केला.

आपल्यावरील प्रेमाने कुमार गंधर्व भारावूनच गेले होते. ते सुरांचे स्वामी खरे, पण सत्काराला उत्तर देताना मात्र शब्द उमटेनात. कंठात सुरांबरोबर भावनांची दाटी झालेली

व त्या क्षणी भावनेने सुरांवर मात केली.

प्रख्यात चित्रपट निर्माते जे. बी. एच. वाडिया यांनी १९३६-३७ सालच्या सुमारास अडीच मिनिटांचा एक लघुपट कुमार गंधर्वांवर तयार केला होता. तो या प्रसंगी दाखवण्याची संयोजकांची इच्छा होती. त्यांनी वाडियांना पत्र लिहिले व त्यांनी संमतीही दिली. पण वाडिया यांनी, हा लघुपट जतन करावा म्हणून पुणे येथील फिल्म इन्स्टिट्यूटच्या अर्काईव्हजकडे पूर्वीच दिला होता. पण अर्काईव्हजचा हलगर्जी कारभार असा की हा लघुपट आता सापडत नाही, असे त्यांनी कळविले.

कुमार गंधर्वांना दिलेल्या छोट्या सन्मानपत्रात त्यांचे वर्णन संगीत तपस्वी, प्रखर चिंतक व श्रेष्ठ गायक असे करण्यात आले. शास्त्रीय परंपरा, आधुनिक विचार व लोकभूमी या तीन गोष्टींचे मीलन असलेले त्यांचे संगीत हे त्रिभुवन संगीत आहे, असा गौरवही त्यात केलेला होता. आणि नंतर हे संगीत 'भूलोकी' अवतरले. कुमार गंधर्वांनी श्री, तिलक कामोद, कल्याण आदी राग व काही भजने, माळव्याची दोन लोकगीते गाऊन रसिकांच्या सन्मानाला अप्रतिम संगीत प्रत्युत्तरच दिले.

## उद्योगपतींना चहापान

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स अॅण्ड कॉमर्सची वार्षिक बैठक नुकतीच दिल्लीत झाली. नवे अध्यक्ष म्हणून मुंबईचे उद्योगपती श्री. रामकृष्ण बजाज यांची निवड झाली. या बैठकीच्या निमित्ताने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मराठा चेंबर व गोवा चेंबर यांच्या वतीने दरवर्षी महाराष्ट्रातील एखाद्या मंत्र्याच्या घरी चहापानाचा कार्यक्रम आयोजिला जातो. यंदा हा कार्यक्रम दळणवळण खात्याचे राज्यमंत्री विठ्ठलराव गाडगीळ यांच्या ९, रेसकोर्स रोड या निवासस्थानी आयोजिला होता. आंब्याची डाळ, पन्हे व साबुदाणा वडे असा महाराष्ट्रीय मेनू सौ. सुनीता गाडगीळ यांनी ठेवला होता.

'फिकी'चे मावळते अध्यक्ष श्री. अशोककुमार जैन यांनी महाराष्ट्राचा दौरा आपण मनासारखा करू शकलो नाही, असे सांगितले. महाराष्ट्राच्या विधायक औद्योगिक धोरणाचे अन्य राज्यांनी अनुकरण केले पाहिजे, असे त्यांनी सुचवले. नवे अध्यक्ष बजाज यांनी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ही तर माझी प्रशिक्षण शाळाच आहे, असे म्हटले. महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष शशिकांत गरवारे यांनी उरणचा पूल, मनमाड-औरंगाबाद रेल्वेमार्ग रुंदीकरण या प्रश्नांकडे लक्ष देण्याची विनंती केली. श्री. जैन व श्री गरवारे इंग्रजीतून, बजाज हिंदीतून तर बॅ. गाडगीळ मराठीतून बोलले.

पुणेकरांच्या 'पाहुणचाराच्या' लौकिकाचा उल्लेख करून गाडगीळ म्हणाले, "हे घर माझं आहे, खर्च मात्र महाराष्ट्र चेंबरचा आहे. तेव्हा या लौकिकानुसारच हे आहे, तीस वर्षांपूर्वी माझे वडील काकासाहेब गाडगीळ यांच्या फिरोजशहा रोडवरील निवासस्थानी असाच उद्योगपतींचा चहापान समारंभ झाला होता. आता माझ्या घरी होत आहे. तेव्हा या बाबतीत तरी घराणेशाही मंजूर दिसते! पूर्वी महाराष्ट्रात उद्योजकता नाही असे म्हणत. श्री. घासवाला म्हणायचे, उसाच्या रसाचे गुऱ्हाळ काढायचे व त्याला मशीन बसवले

की झाले उद्योगीकरण अशी तुमची कल्पना आहे. सेंट्रल हॉलमध्ये परवा सहज गप्पा चालल्या होत्या. तेव्हा एकजण म्हणाला, चंद्रावर जाणारा पहिला भारतीय माणूस सरदारजी असेल. पण तेथे तो पोचेल; तेव्हा त्याला तेथे त्याच्या आधीच कुलकर्णी, कर्णिक, कदम असे कोणी मराठी पोचलेले दिसतील. ते सरदारजीला म्हणतील, तुम्ही येथे आलात म्हणजे कारखाना काढाल. तेथे टायपिस्टची नोकरी मिळावी, म्हणून आम्ही आधीच आलो आहोत. पण आता हे चित्र प्रतिमा बदलली आहे.''

या निमित्ताने जाणवले ते असे, की दिल्लीत राजकारण्यांप्रमाणे मराठी उद्योगपतींचीही फारशी प्रभावी लॉबी नाही.

□

**– अशोक जैन**

**('राजधानीतून ... २' या पुस्तकातून)**